**महाराष्ट्र शासन**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय :
मोशी रोड , अमरावती ४४४ ६०३
Web.WWW.rodevtamt.org e-mail: : dydt_amt@yahoo.co.in
Phone No. २६६६ ०४८, २६६०५८८ / Fax No :- २६६०३२० (personel ): २६६६ १८६

556
11/4/12

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक:०८/प्रशिक्षण/कौस्पर्धा/२०१२/1959
दिनांक :-30- ३ - २०१२

-3.4.12

POSTAGE INDIA भारत 05.00 RUPEES PBB No 03691

प्रति,

प्राचार्य, श्री छत्रपती शाहु महाराज
~~शासकीय~~ /अशासकीय
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, /केंद्र वणी
अमरावती विभाग (सर्व) जि. यवतमाळ

विषय :- गटनिदेशक / निदेशकांच्या कौशल्य स्पर्धा - २०१२

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येत की, मा. संचालक, ( प्रशिक्षण ) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक १७/निदे.कौ.स्पर्धा/२०१२/ २७९ दिनांक २९-३-२०१२ रोजीच्या पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडण्यांत येत आहे. सदर पत्रातील नमुद सुचने प्रमाणे गटनिदेशक / निदेशक यांची कौशल्य स्पर्धा परिक्षांचे आयोजन करण्यांत आलेले असुन संस्थेतील ज्या गटनिदेश / निदेशक यांना परीक्षेस बसावयाचे आहे त्यांनी दि. १६-४-२०१२ पर्यंत अर्ज जिल्हास्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला सादर करावे. जिल्हास्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने जिल्हयातील शासकीय / अशासकीय संस्थेतील गटनिदेशक / निदेशक यांचे प्राप्त अर्जानुसार व्यवसाय निहाय यादी तयार करुन सी.डी. व प्रिंट आऊट दि. १७-४-२०१२ पर्यंत या कार्यालयास हस्तदेय सादर करावी.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

(एस.एम.हस्ते)
सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय,अमरावती

10/04/12

महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

WWW.DVET.GOV.IN e-mail: :DVETEXAMS@YAHOO.COM TEL -22620293/ 226201008

Fax-22659235(Tr.)/22675628(Voc) Phone No. 22695819 (वैय)

क्र.१७/निदे.कौ.स्प./२०१२/ २७९

दिनांक :२० /०३/२०१२

प्रति,

सहसंचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,

प्रादेशिक कार्यालय,

मुंबई/नाशिक /पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय :- गटनिदेशक/निदेशकांच्या कौशल्य स्पर्धा-२०१२

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्यातील शासकीय / अशासकीय संस्थेतील गटनिदेशक/निदेशक यांची कौशल्य स्पर्धा परिक्षांचे आयोजन करण्यात येत आहे.

१ ) अशासकीय गटनिदेशक / निदेशक यांना जिल्हा, विभागीय व राज्य अशा तिन्ही स्तरावरील कौशल्य स्पर्धा परिक्षेकरिता जाण्यायेण्याचा खर्च अशासकीय केंद्राला किंवा निदेशकाला स्वतः करावा लागेल. शासनाकडून त्यास कोणत्याही प्रकारचा जाण्यायेण्याचा व महागाई भत्ता देय होणार नाही या अटीवर सहभागास परवानगी देण्यात येत आहे.

२ ) परिक्षेच्या प्रश्नपत्रिका परिक्षा केंद्रांना संचालनालयाकडून प्राप्त होतील.

३ ) हया वर्षीच्या कौशल्य स्पर्धा परिक्षा खालील १९ व्यवसायात घेण्यात येणार आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुतारकाम | ११ | यांत्रिकी प्रशितन व वातानुकुलीकरण |
| २ | संधाता | १२ | यंत्रकारागिर (घर्षक) |
| ३ | जोडारी | १३ | कोपा |
| ४ | कातारी | १४ | पत्रेकारागिर |
| ५ | यंत्रकारागिर | १५ | यांत्रिकी (डिझेल) |
| ६ | विजतंत्री | १६ | कर्तन व शिवण |
| ७ | तारतंत्री | १७ | ड्रेस मेकींग |
| ८ | यांत्रिक मोटारगाडी | १८ | टुल ॲण्ड डायमेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर) |
| ९ | इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | १९ | टुल ॲण्ड डायमेकर (मोल्ड ॲण्ड डाईज) |
| १० | रंगारी | | |

तरी याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अशासकीय संस्था / केंद्रांना कळवून संबधीत व्यवसायातील गटनिदेशक / निदेशकांचे विहित नमुन्यात अर्ज घेण्यात यावेत अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे. **अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक १६/०४/२०१२** असून त्यानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येवू नयेत. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार व्यवसाय निहाय याद्या तयार करून त्याची **C.D.** व प्रिंट आऊट दि.२०/०४/२०१२ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत संचालनालयास सादर कराव्यात. म्हणजे त्याप्रमाणे प्रश्नपत्रिकांची संख्या निश्चित करणे संचालनालयास सोयीचे होईल.

जिल्हास्तर कौशल्य स्पर्धा हि संबधित विभागातील प्रत्येक जिल्हास्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत घेण्यात यावी म्हणजेच जिल्हास्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेचे परिक्षा केंद्र हे **जिल्हयांच्या ठिकाणची औ.प्र.संस्था मुक्रर** करण्यात येत आहे. क्वचीत प्रकरणी एखाद्या परिक्षा केंद्रात सदर व्यवसाय नसतील तर त्यावेळी त्या जिल्हयातील जवळची **औ.प्र.संस्था** हे सदर परिक्षेचे केंद्र ठरविण्यात यावे.व त्याबाबत संचालनालयास कळवावे.

## १) परीक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | कौशल्य स्पर्धेचे नांव | स्पर्धकांच्या यादया परिक्षा केंद्रांना पाठविण्याचा दिनांक | बिल ऑफ मटेरिअल | प्रश्नपत्रिका पाठविण्याचा दिनांक | चाचणी परिक्षेचा दिनांक | निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा स्तर | २०/०४/२०१२ | ०२/०५/२०१२ | ०८/०५/२०१२ | ११/०५/२०१२ | १५/५/२०१२ |
| २ | विभाग स्तर | २०/०५/२०१२ | १९/०५/२०१२ | २२/०५/२०१२ | २५/०५/२०१२ | ४/६/२०१२ |
| ३ | राज्य स्तर | १०/०६/२०१२ | ०७/०६/२०१२ | १८/०६/२०१२ | २०/०६/२०१२ | २८/६/२०१२ |

## २) जिल्हा स्तरावरील स्पर्धा परिक्षांची परिक्षा केंद्रे.

| अ.क्रं. | विभागाचे नांव | जिल्हा परिक्षा केद्रांचे नांव/ औ.प्र.संस्था. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | मुलुंड (मुंबई शहर व उपनगरासाठी) | ज्या परिक्षा केंद्रामध्ये वरील १९ व्यवसाया पैकी ज्या व्यवसायाची परिक्षा घेणे शक्य नसेल अशा व्यवसायाची परिक्षा नजिकच्या औ.प्र.संस्थेत घ्यावी व त्याबाबत अहवाल संचालनालयास तात्काळ कळवावा |
| २ | | ठाणे | |
| ३ | | पनवेल | |
| ४ | | रत्नागिरी | |
| ५ | | सावंतवाडी | |
| ६ | नाशिक | नाशिक | |
| ७ | | धुळे | |
| ८ | | जळगांव | |
| ९ | | अहमदनगर | |
| १० | | नंदुरबार | |
| ११ | औरंगाबाद | औरंगाबाद | |
| १२ | | नांदेड | |
| १३ | | जालना | |
| १४ | | लातुर | |
| १५ | | बीड | |
| १६ | | उस्मानाबाद | |
| १७ | | हिंगोली | |
| १८ | | परभणी | |
| १९ | अमरावती | अमरावती | |
| २० | | अकोला | |
| २१ | | बुलढाणा | |
| २२ | | यवतमाळ | |
| २३ | | वाशिम | |
| २४ | नागपूर | नागपूर | |
| २५ | | भंडारा | |
| २६ | | चंद्रपूर | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | | गोंदिया | |
| २८ | | गडचिरोली | |
| २९ | | वर्धा | |
| ३० | | औंध-पुणे | |
| ३१ | | सातारा | |
| ३२ | पुणे | सांगली | |
| ३३ | | सोलापूर | |
| ३४ | | कोल्हापूर | |

३) *विभागिय कौशल्य स्पर्धा खालील परिक्षा केंद्रावर घेतल्या जातील.*

| अ.क्र | विभागाचे नाव | विभागीय स्पर्धा केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | मुंबई | औ. प्र. संस्था, मुंबई. ११ |
| २ | नाशिक | औ. प्र. संस्था, अहमदनगर |
| ३ | पुणे | औ. प्र. संस्था, औंध पुणे |
| ४ | औरंगाबाद | औ. प्र. संस्था, लातूर |
| ५ | अमरावती | औ. प्र. संस्था, यवतमाळ |
| ६ | नागपूर | औ. प्र. संस्था, नागपूर |

विभागीय स्तर व राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेतील उमेदवारांच्या यादया संबधीत परीक्षा केंद्राकडून संबधीत परिक्षेच्या परिक्षाकेंद्राना नमुद दिनांकास उपलब्ध करुन दयाव्यात.

४) **राज्यस्तर कौशल्य स्पर्धा.**

राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धा दिनांक २०/०६/२०१२ रोजी शासकीय औ. प्र.संस्था, सातपूर नाशिक (अ.क्र. १ ते ९) येथे व औ. प्र.संस्था, औरंगाबाद (अ.क्र. १० ते १९) येथे घेण्यात येईल व अंतिम निकाल दि.२८/०६/२०१२ रोजी जाहिर करण्यात येईल.

५) **स्पर्धेची वेळ व कालावधी.**

जिल्हा व विभागीय पातळीवरील स्पर्धा सकाळी ०८.०० वाजता सुरु होतील व त्याच दिवशी संपविण्यात येतील सदर परिक्षेसाठी कालावधी अनुक्रमे ८ व १० तास असेल.
राज्यस्तर परिक्षेसाठी १२ तास कालावधी असेल व काही अपरिहार्य कारणास्तव स्पर्धा एकाचदिवशी १२ तास घेणे शक्य नसेल अशा परिस्थितीत प्रत्येक दिवशी ६ तास या प्रमाणे सलग दोन दिवस घेण्यात येईल.

६) बिल ऑफ मटेरियल व प्रश्नपत्रिका आपणांस वरील नमुद कार्यक्रमानुसार संचालनालयातून प्राप्त होतील. प्रश्नपत्रिका स्विकारण्याकरिता जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांना नियोजित दिनांकास पाठविण्यात यावे.

जिल्हास्तर / विभागीयस्तर / राज्यस्तरावरील परीक्षेचे जॉब त्याच परीक्षा केंद्रावर परिसरातील औद्योगिक आस्थापनातील तज्ञ व नजिकच्या तंत्रनिकेतन मधील तज्ञ अधिकाऱ्यांमार्फत तपासून निकाल तयार करण्याची कार्यवाही नमुद कार्यक्रमानुसार परीक्षा केंद्रप्रमुखांनी करावयाची आहे.

( शे.गि.देवडकर )
सहसंचालक

प्रत :- १) जिल्हास्तरीय / विभागीयस्तर / राज्यस्तरीय परीक्षा केंद्रप्रमुख यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
२) सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्र यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीत रवाना.

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

## गटनिदेशक/निदेशकांच्या कौशल्य स्पर्धा-२०१२

अर्जाचा नमुना

नांव :-
पत्ता :-
व्यवसाय :-
दिनांक :-

प्रति,
प्राचार्य,
औ. प्र. संस्था/औ.प्र. केंद्र.

महोदय,

मी निदेशक / गट निदेशक यांचेसाठी आयोजित केलेल्या सन २०१२ च्या कौशल्य स्पर्धेत भाग घेऊ इच्छितो / इच्छिते त्यानुसार माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

१) संपूर्ण नाव ( ठळक अक्षरात ) :-

२) ज्या संस्थेत /केंद्रात काम करित आहे त्या संस्थेचे / केंद्राचे नाव :-

३) सध्या धारण केलेले पद :-

४) कोणत्या व्यवसायात भाग घेणार त्या व्यवसायाचे नाव :-

५) सध्या धारण केलेल्या पदावर नेमणूकीचा दिनांक :-

६) खात्यातील एकूण सेवाकाळ :-

शासनाने सदर कौशल्य स्पर्धेसाठी जे नियम व अटी लागू केलेल्या आहेत त्या मला मान्य असून स्पर्धेत भाग घेताना त्या माझेवर बंधनकारक राहतील.

आपला विश्वासू,

( )